महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५
अंतर्गत लोकसेवा, नियत कालमर्यादा,
पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय
अपिलीय प्राधिकारी अधिसूचित करणेबाबत

# महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास विभाग

**शासन निर्णय क्रमांकः आरटीएस-२०१५/प्र.क्र.३२/पं.रा-५**
**बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड,**
**फोर्ट, मुंबई - ४०० ००१**
**तारीख: १४ जुलै, २०१५**

**वाचा :** **महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५, दिनांक २८ एप्रिल, २०१५**

**प्रस्तावना :**

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरीता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ हा दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम ३ मध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकारणाने अध्यादेश लागू झाल्यानंतर ३ महिन्याच्या कालावधीच्या आत आणि त्यानंतर वेळोवेळी ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा या अध्यादेशाखाली अधिसूचित करणे आवश्यक आहे. सदरहु अध्यादेश निर्गमित करण्यामागे सार्वजनिक प्राधिकरणाने त्या पुरवित असलेल्या सेवा अधिनियमांतर्गत अधिसूचित करुन त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे आवश्यक आहे.

**शासन निर्णय:**

या विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखाली राज्यातील सर्व ग्रामस्थांना पारदर्शक, गतिमान, लोकाभिमुख व प्रतिसादशिल प्रशासनाद्वारे जबाबदारीने सेवा पुरविणे ही पंचायती राज संस्थाची जबाबदारी आहे. पंचायत राज संस्थेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवांपैकी नागरिकांना दैनंदिन जीवनामध्ये सातत्याने आवश्यक असणा-या व ज्या लोकसेवांचा जास्तीत जास्त नागरिकांनी फायदा घेतला आहे व ज्या सेवा महत्वाच्या आहेत अशा लोकसेवांची निश्चिती करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ च्या कलम-३ अनुसार अधिसूचित करावयाच्या सेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय प्राधिकारी आणि नियत कालमर्यादा याबाबतची अधिसूचना दिनांक १० जुलै, २०१५ रोजी निर्गमित करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांबाबतची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना

निर्गमित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता. त्या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

१) ग्रामपंचायत स्तरावर ग्रामस्थांना सातत्याने लागणा-या सेवांबाबतचा विचार करुन या शासन निर्णयाच्या सोबत जोडलेल्या **सहपत्र-अ** मध्ये नमूद केलेल्या एकूण १३ सेवा दिनांक १० जुलै, २०१५ रोजीच्या अधिसूचनेन्वये अधिसूचित करण्यात आल्या आहेत.

२) सहपत्र-अ मध्ये अधिसूचित केलेल्या सेवा नागरिकांना उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने राज्यामध्ये सर्व ठिकाणी एकसूत्रता व समानता ठेवण्याच्या अनुषंगाने नागरिकांनी करावयाच्या अर्जाचा नमुना, अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे, सेवा ज्या प्रमाणपत्र / दाखल्याद्वारे उपलब्ध करुन द्यावयाची आहेत त्याबाबतचे नमुने विहित करण्यात आले असून ते या शासन निर्णयासोबत जोडण्यात आलेले आहेत. अर्जदारास अर्ज करण्याकरीता संबंधित पदनिर्देशित अधिकारी हा आवश्यक ती सर्व मदत करेल. ग्रामपंचायतींना सहपत्र-अ मध्ये नमूद केलेल्या सेवांमध्ये व विहित करण्यात आलेल्या नमुन्यांमध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

३) प्रत्येक ग्रामपंचायतीने सहपत्र-अ मध्ये दर्शविण्यात आलेला तपशिल कार्यालयाच्या सूचना फलकावर सुवाच्य अक्षरामध्ये ठळकपणे प्रदर्शित करावा.

४) ग्रामस्थांनी मागणी केल्यानंतर सदर अधिसूचित करण्यात आलेल्या सेवा त्या त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या कालमर्यादेत संबंधित पदनिर्देशित अधिका-याने उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

५) अधिसूचित केलेल्या सेवा पदनिर्देशित अधिका-याने विहित कालमर्यादेत उपलब्ध करुन न दिल्यास संबंधित अर्जदाराला महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ कलम ९(१) मध्ये नमूद कालावधीत सहपत्र-अ मध्ये अधिसूचित सेवेसमोर दर्शविण्यात आलेल्या प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपिल दाखल करता येईल व प्रथम अपिलीय प्राधिका-याने त्याचेकडे प्राप्त झालेल्या अपिलावर महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५ कलम ९(२) प्रमाणे कार्यवाही करावी.

६) अर्जदारास / अपिलकर्त्यास प्रथम अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाविरुध्द / आदेश प्राप्त न झाल्यास महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ कलम ९(३) मध्ये नमूद कालावधीत सहपत्र-अ मध्ये अधिसूचित सेवेसमोर दर्शविण्यात आलेल्या द्वितीय अपिलीय प्राधिका-याकडे दुसरे अपिल दाखल करता येईल व द्वितीय अपिलीय प्राधिका-याने

त्याचेकडे प्राप्त झालेल्या अपिलावर महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ कलम ९(४) प्रमाणे कार्यवाही करावी.

७) पदनिर्देशित अधिकारी किंवा प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांचेवर सोपविण्यात आलेल्या जबाबदारीमध्ये कसूरी केल्यास त्यांना शास्ती करण्याची तरतूद महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ मधील कलम १० मध्ये करण्यात आली असून सदर शास्तीच्या वसुलीच्या कार्यपध्दतीची तरतूद उक्त अध्यादेशाच्या कलम-११ मध्ये करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित प्राधिका-यांनी कार्यवाही करावी.

८) संबंधित पदनिर्देशित अधिका-याने वारंवार केलेल्या कसूरीबद्दल सक्षम प्राधिका-याने पदनिर्देशित अधिका-यावर जबाबदारी निश्चित करणे व त्याबाबतच्या कार्यपध्दतीची तरतूद महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ मधील कलम १२ मध्ये करण्यात आली असून सक्षम प्राधिका-यांनी त्यानुसार कार्यवाही करावी.

९) सहपत्र-अ मध्ये अधिसूचित करण्यात आलेल्या सेवा पुरविण्याकरीता संबंधित सेवेसमोर दर्शविण्यात आलेली फी ही अर्जदाराने अर्ज सादर करतेवेळी पदनिर्देशित अधिका-याकडे जमा करणे आवश्यक राहील. पदनिर्देशित अधिका-याने सदर जमा होणा-या फीबाबत शासन निर्णय क्रमांक : संग्राम-२०१३/प्र.क्र.२९/संग्राम कक्ष, दिनांक १ नोव्हेंबर, २०१३ अन्वये देण्यात आलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करावी.

१०) ग्रामपंचायतींकडे लोकसेवांसाठी प्राप्त होणा-या अर्जांकरीता स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात यावी. त्याबाबतचा नमुना विहित करण्यात आला असून तो या शासन निर्णयासोबत **सहपत्र-ब** असा जोडण्यात आला आहे.

११) ज्या ग्रामपंचायतींकडे सहपत्र-अ मध्ये नमूद सेवा पात्र व्यक्तींना उपलब्ध करुन देण्याकरीता ऑनलाईन कार्यप्रणाली कार्यान्वित असेल, त्या ठिकाणी सदर सेवा संगणकीकृत प्रतींद्वारेही देता येईल. ज्या ठिकाणी ऑनलाईन प्रणाली कार्यान्वित नाही, त्या ठिकाणी सदर सेवा सोबत जोडलेल्या विहित नमुन्यांमध्ये उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

१२) पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी व द्वितीय अपिलीय प्राधिकारी यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ मधील तरतुदींनुसार कार्यवाही करावी.

१३) सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर शासन निर्णय आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व कार्यालयांच्या निदर्शनास आणून देऊन त्याप्रमाणे कार्यवाही होईल याची दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०७१४१७१६१९२८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**वि.गिरिराज**

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.विरोधी पक्षनेते, विधान परिषद व विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
२. सर्व सन्माननीय विधानपरिषद / विधानसभा सदस्य व संसद सदस्य
३. मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव
४. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
५. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा.राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यालय
७. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव
८. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
९. सर्व विभागीय आयुक्त
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१२. सर्व मंत्रालयीन विभाग
१३. ग्राम विकास विभागातील सर्व कार्यासने
१४. निवड नस्ती (कार्यासन पं.रा-५), ग्रामविकास व जलसंधारण विभाग

## सहपत्र-अ

## महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ च्या कलम ३ अन्वये ग्रामपंचायतींमार्फत द्यावयाच्या लोकसेवांचा तपशील

| अ क्र. | सेवेचे नाव | सेवा पुरविण्यासाठी विहित कालावधी (कामाचे दिवस) | पद निर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय प्राधिकारी | द्वितीय अपिलीय प्राधिकारी | सेवा उपलब्धतेसाठी अर्ज सादर करावयाचे ठिकाण | सेवा उपलब्धतेसाठी अर्जाचा विहित नमुना | सेवा पुरविण्यासाठी अर्जासोबत भरावयाची फी (रुपये) | विहित कालावधीनंतर सेवा कोणत्या ठिकाणावरुन उपलब्ध होणार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जन्म नोंद दाखला | ५ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी | ग्रामपंचायत कार्यालय | उपलब्ध आहे. | २०/- | ग्रामपंचायत कार्यालय |
| २ | मृत्यु नोंद दाखला | ५ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी | ग्रामपंचायत कार्यालय | उपलब्ध आहे. | २०/- | ग्रामपंचायत कार्यालय |
| ३ | विवाह नोंद दाखला | ५ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी | ग्रामपंचायत कार्यालय | उपलब्ध आहे. | २०/- | ग्रामपंचायत कार्यालय |
| ४ | रहिवाशी दाखला | ५ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी | ग्रामपंचायत कार्यालय | उपलब्ध आहे. | २०/- | ग्रामपंचायत कार्यालय |
| ५ | दारिद्र्य रेषेखाली (BPL) असल्याचा दाखला | ५ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी | ग्रामपंचायत कार्यालय | उपलब्ध आहे. | निशुल्क: | ग्रामपंचायत कार्यालय |
| ६ | हयातीचा दाखला | ५ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी | ग्रामपंचायत कार्यालय | उपलब्ध आहे. | निशुल्क: | ग्रामपंचायत कार्यालय |
| ७ | ग्रामपंचायत येणे बाकी दाखला | ५ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी | ग्रामपंचायत कार्यालय | उपलब्ध आहे. | २०/- | ग्रामपंचायत कार्यालय |
| ८ | शौचालयाचा दाखला | ५ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी | ग्रामपंचायत कार्यालय | उपलब्ध आहे. | २०/- | ग्रामपंचायत कार्यालय |
| ९ | नमुना ८ चा उतारा | ५ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी | ग्रामपंचायत कार्यालय | उपलब्ध आहे. | २०/- | ग्रामपंचायत कार्यालय |
| १० | निराधार असल्याचा दाखला | २० दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी | ग्रामपंचायत कार्यालय | उपलब्ध आहे. | निशुल्क: | ग्रामपंचायत कार्यालय |
| ११ | विधवा असल्याचा दाखला | २० दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी | ग्रामपंचायत कार्यालय | उपलब्ध आहे. | २०/- | ग्रामपंचायत कार्यालय |
| १२ | परित्यक्ता असल्याचा दाखला | २० दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी | ग्रामपंचायत कार्यालय | उपलब्ध आहे. | २०/- | ग्रामपंचायत कार्यालय |
| १३ | विभक्त कुटुंबाचा दाखला | २० दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी | ग्रामपंचायत कार्यालय | उपलब्ध आहे. | २०/- | ग्रामपंचायत कार्यालय |

सहपत्र-ब

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५

| नोंदवही | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामपंचायत --------------------------, तालुका -------------------------------, जिल्हा ------------------------------ | | | | | | | | |
| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अर्ज कोणत्या सेवेसाठी दाखल केलेला आहे त्याचा तपशील | प्रमाणपत्र / दाखला सेवा शुल्क | | सेवा उपलब्ध केल्याचा दिनांक | सेवा उपलब्ध झाल्याबद्दल सही / अंगठा | शेरा |
| | | | | पावती क्र./दिनांक | रुपये | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

# <u>महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ अंतर्गत दाखला/प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्जाचा नमुना</u>

कार्यालयीन अर्ज नोंदणी क्रमांक

दिनांक -

अर्जदाराचे नांव ------------ --------------------------------

पत्ता -----------------------------------------

-----------------------------------------

दुरध्वनी क्रमांक ------------------------------

आधार कार्ड क्रमांक (असल्यास)----------------

ई मेल आयडी (असल्यास)----------------------

प्रति,

सरपंच / ग्रामसेवक / निबंधक

ग्रामपंचायत ---------------

ता-----------.जि --------------.

**विषय §महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ अंतर्गत दाखला / प्रमाणपत्र मिळणेबाबत**

महोदय,

मी, खालील स्वाक्षरी करणार वरील पत्त्यावर राहत असून मला खालील दाखल्याची आवश्यकता आहे .

| | |
|---|---|
| | **जन्म नोंद दाखला (नाव------------------------/जन्म दिनांक--------------------)** |
| | **मृत्यु नोंद दाखला (नाव------------------------/मृत्यु दिनांक--------------------)** |
| | **विवाह नोंदणी दाखला (विवाहाचा दिनांक--------------------)** |
| | **रहिवाशी दाखला** |
| | **दारिद्रय रेषेखालील असल्याचा दाखला (निशुल्क)** |
| | **हयातीचा दाखला(निशुल्क)** |
| | **ग्रामपंचायत येणे बाकी दाखला** |
| | **शौचालयाचा दाखला** |
| | **नमुना नं.८ चा उतारा (मालमत्ता कर आकारणी नोंदवही उतारा) घर नं.----------------** |
| | **निराधार असल्याचा दाखला (निशुल्क)** |
| | **विधवा असल्याचा दाखला** |
| | **परित्यक्ता असल्याचा दाखला** |
| | **विभक्त कुटुंबाचा दाखला** |

मला महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ अंतर्गत दाखला देण्यात यावा. सदरच्या दाखल्याकरीता आवश्यक शुल्क रुपये --------भरण्यास तयार आहे. तरी दाखला मिळावा ही विनंती.

**आपला विश्वासू**

सोबत जोडपत्र

१)

२)

३)

**पोहोच**

श्री/श्रीमती.----------------------------------------यांचा ------------------------------दाखला मागणी अर्ज दिनांक ------------ रोजी प्राप्त झाला.

**अर्ज नोंदणी क्र** .

**पदनिर्देशित अधिकारी**

## महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ अंतर्गत दाखला / प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे

| अ.क्र. | सेवेचे नांव | अर्जासोबत द्यावयाचे कागदपत्र |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | जन्म नोंद दाखला | आवश्यकता नाही |
| २ | मृत्यू नोंद दाखला | आवश्यकता नाही |
| ३ | विवाह नोंदणी दाखला | आवश्यकता नाही |
| ४ | रहिवाशी दाखला | १. वीज देयक<br>२. आधार कार्ड<br>३. मतदार ओळखपत्र<br>४. रेशनकार्ड<br>५. घरपट्टी<br>६. भाडे करार<br>वरील पैकी कोणताही एक पुरावा सादर करावा. |
| ५ | दारिद्रय रेषेखालील असल्याचा दाखला | आवश्यकता नाही |
| ६ | हयातीचा दाखला | १) आधार कार्ड<br>२) मतदार ओळखपत्र<br>३) वाहन चालविण्याचा परवाना<br>४) पारपत्र<br>५) पॅनकार्ड<br>६) छायाचित्र असलेले कोणताही शासकीय ओळखपत्र<br>वरील पैकी कोणताही एक पुरावा सादर करावा. |
| ७ | ग्रामपंचायत येणे बाकी नसल्याचा दाखला | आवश्यकता नाही |
| ८ | शौचालयाचा दाखला | आवश्यकता नाही |
| ९ | नमुना नं .८ चा उतारा | आवश्यकता नाही |
| १० | निराधार असले बाबतचा दाखला | कुटुंब प्रमुखाचा मृत्यू दाखला |
| ११ | विधवा असले बाबतचा दाखला | पतीच्या मृत्यूचा दाखला |
| १२ | परितक्त्या असले बाबतचा दाखला | मा.न्यायालयाचे आदेशाची प्रत (असल्यास उपलब्ध करावी ) |
| १३ | विभक्त कुटुंबाचा दाखला | आवश्यकता नाही |

प्रमाणपत्र क्र./Certificate No. नमुना ५ / Form ५

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

Government of Maharashtra

आरोग्य विभाग

Health Department

प्रमाणपत्र निर्गमित करणा-या स्थानिक क्षेत्राचे नाव ______________

Name of the local body issuing Certificate________________

## जन्म प्रमाणपत्र / BIRTH CERTIFICATE

(जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ च्या कलम १२/१७ आणि महाराष्ट्र जन्म व मृत्यु नोंदणी नियम २००० चे नियम ८/१३ अन्वये देण्यात आले आहे.)

(Issued under section १२/१७ of the Registration of Births & Deaths Act, १९६९ and rule ८/१३ of the Maharashtra Registration of Births and Death Rules २०००)

प्रमाणित करण्यात येत आहे की खालील माहिती जन्माच्या मूळ अभिलेखाच्या नोंदवहीतून घेण्यात आली आहे ज्याचा (स्थानिक क्षेत्र) ________________, तालुका ________________, जि________________ महाराष्ट्र राज्याच्या नोंदवहीत उल्लेख आहे.

This is to certify that the following information has been taken from the original record of birth which is the register for (local area / local body) ____________ of tehsil / block _____________ of district ______________of Maharashtra State.

आधारकार्ड क्रमांक: Adhar Card Number:

बाळाचे पुर्ण नाव: Name of Child:

लिंग: Sex:

जन्म तारीख: Date of Birth:

जन्म ठिकाण: Place of Birth:

आईचे पुर्ण नाव: Full Name of Mother:

वडिलांचे पुर्ण नाव Full Name of Father:

बाळाचे जन्माचेवेळी आई वडिलांचा पत्ता: Address of parents at the time of birth of the child:

आई वडिलांचा कायमचा पत्ता: Permanent Address of the parents:

नोंदणी क्रमांक: Registration No.:

नोंदणी दिनांक: Date of Registration:

शेरा: Remarks (if any):

प्रमाणपत्र दिल्याचा दिनांक: Certificate Issue Date:

निबंधक, जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत ________, ता._____, जि. _________

शिक्का / Seal

प्रत्येक जन्म आणि मृत्यु घटना नोंदविल्याची खात्री करा Ensure Registration of Every Birth & Death

सदर दाखल्याची वैधता तपासण्याची असल्यास https://sangram.mahaonline.gov.in/Certificate Validation.aspx या संकेतस्थळावर भेट देऊ शकता.

डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष-२०१५ २०१५-Year of Digitized & Time Bound Services

प्रमाणपत्र क्र./Certificate No. नमुना ५ / Form ५

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
Government of Maharashtra
आरोग्य विभाग
Health Department

प्रमाणपत्र निर्गमित करणा-या स्थानिक क्षेत्राचे नाव ______________
Name of the local body issuing Certificate________________

## मृत्यु प्रमाणपत्र / DEATH CERTIFICATE

(जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ च्या कलम १२/१७ आणि महाराष्ट्र जन्म व मृत्यु नोंदणी नियम २००० चे नियम ८/१३ अन्वये देण्यात आले आहे.)
(Issued under section १२/१७ of the Registration of Births & Deaths Act, १९६९ and rule ८/१३ of the Maharashtra Registration of Births and Death Rules २०००)

प्रमाणित करण्यात येत आहे की खालील माहिती जन्माच्या मूळ अभिलेखाच्या नोंदवहीतून घेण्यात आली आहे ज्याचा (स्थानिक क्षेत्र) ________________, तालुका ________________, जि________________ महाराष्ट्र राज्याच्या नोंदवहीत उल्लेख आहे.
This is to certify that the following information has been taken from the original record of birth which is the register for (local area / local body) ____________ of tehsil / block _____________ of district ______________of Maharashtra State.

| | |
|---|---|
| आधारकार्ड क्रमांक: | Adhar Card Number: |
| मृताचे पुर्ण नाव: | लिंग: |
| Name of Deceased: | Sex: |
| मृत्यु तारीख: | मृत्यु ठिकाण: |
| Death Date : | Place of Death: |
| आईचे पुर्ण नाव: | वडिलांचे/पतीचे पुर्ण नाव |
| Full Name of Mother: | Full Name of Father/Husband: |
| मयत व्यक्तीचा मृत्युसमयीचा पत्ता: | मयत व्यक्तीचा कायमचा पत्ता: |
| Address of the deceased at the time of Death : | Permanent Address of the deceased: |
| नोंदणी क्रमांक: | नोंदणी दिनांक: |
| Registration No.: | Date of Registration: |
| शेरा: | |
| Remarks (if any): | |
| प्रमाणपत्र दिल्याचा दिनांक: | निबंधक, जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत |
| Certificate Issue Date: | _________, ता._____, जि. ______ |

शिक्का / Seal

प्रत्येक जन्म आणि मृत्यु घटना नोंदविल्याची खात्री करा — Ensure Registration of Every Birth & Death

सदर दाखल्याची वैधता तपासण्याची असल्यास https://sangram.mahaonline.gov.in/Certificate Validation.aspx या संकेतस्थळावर भेट देऊ शकता.
डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष-२०१५ — २०१५-Year of Digitized & Time Bound Services

फोटो

सत्यमेव जयते

फोटो

# महाराष्ट्र शासन

(भाग चार-ब) महाराष्ट्र शासन राजपत्र, मे २०, १९९९/वैशाख ३०, शके १९२१

नमुना -इ FORM -E

## विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र

## CERTIFICATE OF REGISTRATION OF MARRIAGE

(पहा कलम ६(१) आणि नियम ५)

(See Section ६(१) and Rule ५)

प्रमाणित करण्यात येते की,
Certified that the marriage between

पतीचे नाव ---------------------------------------------- आधारकार्ड क्रमांक : ----------------------
Husbands Name ---------------------------------------- Adhar Card Number: -----------------------

राहणार-------------------------------------------------------आणि
Residing at ----------------------------------------------------- and

पत्नीचे नाव ---------------------------------------------- आधारकार्ड क्रमांक : -----------------------
Wife Name ---------------------------------------------- Adhar Card Number: -----------------------

यांचा विवाह दिनांक ----------------रोजी ------------------------ येथे (ठिकाणी)
Solemnized on ---------------------------------------- at ----------------------------

विवाह विधी संपन्न झाला. त्यांची महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंद विधेयक, १९९८
Registered of Marriages maintained under the Maharashtra Regulation of Marriage Bureaus and Registration of Marriages Act १९९८.

अन्वये ठेवण्यात आलेल्या नोंदवहीच्या खंड क्रमांक ------------- च्या अनुक्रमांक ----------------वर
of Volume ------------------ at Serial No. ----------------------

दिनांक ---------------------------- रोजी माझ्याकडून नोंदणी करण्यात आली आहे.
On ------------------------------------registered by me.

ठिकाण / Place :
दिनांक / Date :

निबंधक / विवाह नोंदणी तथा Registrar of Marriage
ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी Gramsevak / Village Development Officer
ग्रामपंचायत Grampanchayat

शिक्का / Seal

## कर आकारणी रजिष्टर उतारा (नमुना ८)

सन ------------- ते सन --------------- करास पात्र इमारती व जमिन यांची आकारणी यादी.

Assessment List Extract (Format No.८)

-----------------------------------ग्रामपंचायत

तालुका : -----------------------जिल्हा : -----------------------

| अ.क्र. | मिळकत नंबर/घर क्र. | मिळकतीचे वर्णन | मालकाचे नांव | भोगवटा करणाऱ्याचे नांव | किंमत | घराची लांबी रुंदी (फुटात) | क्षेत्रफळ एकूण (चौ.फुट) | दर प्रति चौ. फुटात (रुपये) | केलेली आकारणी | | | | एकूण (रुपये) | आकारणी किंवा फेरफार ठराव क्रमांक व तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | घरपट्टी कर (रुपये) | वीज कर (रुपये) | आरोग्य कर (रुपये) | इतर (रुपये) | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| Sr. No | Property No | Description No | Name of the Property | Occupant's Name | Value (in Rs) | Length & height (in feets) | Total Area (in sq.ft) | Rate/ sq.ft (in Rs) | Property Tax (in Rs) | Street Light Tax (in Rs) | Health Tax (in Rs) | Other (in Rs) | Total (in Rs) | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |

ग्रामपंचायत कार्यालय -------------------------- ता................................ जि........................

Grampanchayat Office --------------------- Tal.-------------------- Dist----------------------

## <u>रहिवासी दाखला</u>

## <u>Residence Certificate</u>

जा.क्र. दिनांक :

Dispatch no. Date :

सरपंच/ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत------------------ता.-------------------जि.--------------

Sarpanch/Gramsevak/Village Development Officer, Grampanchayat----------Tal----------Dist----------

यांजकडून दाखला देण्यात येतो की, श्री/श्रीमती ----------------------------------------

is issuing the certificate to Mr./Mrs.------------------------------------------------------

आधार कार्ड क्रमांक --------------------------------

Adhar Card Number ---------------------------------

हे ग्रामपंचायत -------------हद्दीतील मौजे -------------ता.-------------जि.--------------,महाराष्ट्र

of Grampanchayat -----------Village--------------Tal.------------Dist-----------,Maharashtra

येथील कायम/तात्पुरते रहिवासी आहेत.

is a permanent/temporary resident.

सदर दाखला त्यांचे विनंती अर्जानुसार, रहिवासी पुराव्याची पडताळणी व स्थानिक चौकशीच्या आधारे देण्यात येत आहे.

Certificate is issued on request of the applicant, after his resident verification & local level enquiry.

ठिकाण : सही व शिक्का

Place : Signature with Stamp

सरपंच/ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी

Sarpanch/Gramsevak/Village Development Officer

**ग्रामपंचात कार्यालय ------------------ता.--------------------जि.----------------------**

Grampanchayat Office -----------------Tal.-------------------------Dist.------------------

## दारिद्रय रेषेखालील कुटूंबाचा दाखला

## Below Poverty Line Certificate

जा.क्र. दिनांक :

Dispatch no. Date :

ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी

Gramsevak/Village Development Officer

यांजकडून दाखला देण्यात येतो की,

Grampanchayat is issuing the certificate that

श्री/श्रीमती -----------------------------------------------

Mr./Mrs------------------------------------------------------

आधार कार्ड क्रमांक -------------------------------

Adhar Card Number --------------------------------

राहणार-------------------------------ता.-------------------जि.-------------------, महाराष्ट्र

residing at-----------------------Tal.----------------Dist.-----------------------, Maharashtra

यांचा सन -----------------या वर्षातील दारिद्रय रेषेखालील यादीतील क्रमांक--------------------आहे.

in the year -----------------Below Poverty Line List No.-------------------------------------

श्री/श्रीमती ---------------------------------हा/ही/ह्यांची/त्यांचा-----------------------आहे.

ठिकाण : सही व शिक्का

Place : Signature with Stamp

ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी

सील Gramsevak/Village Development Officer

ग्रामपंचात कार्यालय -----------------------ता.-------------------------जि.---------

Grampanchayat Office ---------------------Tal.---------------------------Dist.-------------

हयातीचा दाखला

Living Certificate

जा.क्र. दिनांक :- / /

Dispatch no. Date :- / /

सरपंच/ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी

Sarpanch/Gramsevak/Village Development Officer

ग्रामपंचायत -----------------------------ता.---------------जि.---------------,महाराष्ट्र

Grampanchayat ------------------------ Tal.-----------------Dist-------------, Maharashtra

यांजकडून दाखला देण्यात येतो की, श्री/श्रीमती----------------------------------------------

is issuing the certificate to Mr./Mrs.--------------------------------------------------

आधार कार्ड क्रमांक --------------------------------

Adhar Card Number ---------------------------------

रा. ----------------------ता.-----------------जि.--------------------- येथील रहिवासी आहेत.

is a resident of------------------------Tal.-----------------Dist.---------------------

ते/त्या, आज दिनांक ----------------रोजी हयात आहेत व त्यांनी माझ्या समक्ष सही / अंगठा केलेल्या आहे.

He/She is alive till today, & signing this document in front of me---------------------------

सदर दाखला अर्जदाराच्या मागणीनुसार देण्यात येत आहे.

This certificate is issued on request of the applicant.

ठिकाण : सही व शिक्का

Place : Signature with Stamp

सरपंच/ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी

Sarpanch/Gramsevak/Village Development Officer

अर्जदाराची सही / अंगठा / Applicant Signature

**ग्रामपंचात कार्यालय -----------------------ता.----------------------जि.--------------------**

Grampanchayat Office -------------------Tal.---------------------Dist.---------------------

**थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र**

No Dues Certificate

जा.क्र. दिनांक :-

Dispatch no. Date :-

सरपंच/ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत--------------- ता.------------- जि.--------------

Sarpanch/Gramsevak/Village Development Officer, Grampanchayat ------- Tal--------Dist-------

यांजकडून दाखला देण्यात येतो,

is issuing the certificate,

की श्री/श्रीमती-------------------------------------------

that Mr./Mrs.-----------------------------------------------

आधार कार्ड क्रमांक --------------------------------

Adhar Card Number --------------------------------

हे/ह्या मौजे------------ता.-------------जि.-------------, महाराष्ट्र येथील कायमचे रहिवासी असून

is a permanent resident of -----------Tal.------------Dist.-------------------, Maharashtra

त्यांच्याकडे ग्रामपंचायतीची कोणत्याही प्रकारची थकबाकी नाही.

and he/she has no balance due to towards Grampanchayat.

सदर दाखला अर्जदाराच्या विनंती अर्जानुसार देण्यात येत आहे.

This certificate is issued on request of the applicant.

ठिकाण : सही व शिक्का

Place : Signature with Stamp

सरपंच/ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी

Sarpanch/Gramsevak/Village Development Officer

ग्रामपंचात कार्यालय -------------------------ता.------------------------जि.-----------------------

Grampanchayat Office ---------------------Tal.-------------------------Dist.----------------------

**शौचालय दाखला**

**Toilet Certificate**

जा.क्र. दिनांक :-

Dispatch no. Date :-

ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत----------------- ता.----------------- जि.----------------

Gramsevak/Village Development Officer Grampanchayat ----------- Tal.----------Dist---------

यांजकडून दाखला देण्यात येतो की, श्री/श्रीमती---------------------------------------

is issuing the certificate to Mr./Mrs.-------------------------------------------

आधार कार्ड क्रमांक ---------------------------------

Adhar Card Number ---------------------------------

हे/ह्या ग्रामपंचायत---------- हद्दीतील मौजे---------- ता.--------------जि.------------, महाराष्ट्र येथील रहिवासी आहेत.

is a resident of Grampanchayat--------------Village------------Tal.-----------Dist.--------------, Maharashtra

त्यांचे ग्रामपंचायत मिळकत क्र.----------------------------

at property no.----------------------------------

मध्ये शौचालय असून ते त्याचा वापर करीत आहेत.

They have an attached toilet and it is being used by them.

सदर दाखला अर्जदाराच्या मागणी नुसार देण्यात येत आहे.

This certificate is issued on request of the applicant.

ठिकाण : सही व शिक्का

Place : Signature with Stamp

ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी

Gramsevak/Village Development Officer

## निराधार असल्याचा दाखला

## Certificate of Niradhar

दाखला.क्र.------------------------------------ दिनांक :- -------------------

Certificate Number : --------------------------- Date : --------------------------

सरपंच/ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ------------------ ता.----------------- जि.----------------

Sarpanch/Gramsevak/Village Development Officer ------------ Tal.-----------Dist----------------

यांजकडून दाखला देण्यात येतो की, श्री/श्रीमती---------------------------------------------------

is issuing the certificate to Mr./Mrs.---------------------------------------------------------

आधार कार्ड क्रमांक --------------------------------

Adhar Card Number --------------------------------

हे ग्रामपंचायत------------------- ता.----------------------जि.-----------------------, महाराष्ट्र

Of grampanchayat ---------------------Tal.--------------Dist.----------------, Maharashtra

येथील रहिवासी असून स्थानिक चौकशीच्या आधारे निराधार असल्याचा दाखला त्यांचे विनंती अर्जानुसार देण्यात येत आहे.

is a resident and certified that as per the local level enquiry, she is Niradhar. Certificate is issued on request of the applicant.

सही व शिक्का

Signature with Stamp

ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी

Gramsevak/Village Development Officer

## विधवा असल्याचा दाखला
## Widow Certificate

दाखला.क्र.------------------------------------ दिनांक :- -------------------

Certificate Number : -------------------------- Date : -------------------------

सरपंच/ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ------------------- ता.---------------- जि.--------------

Sarpanch/Gramsevak/Village Development Officer ---------- Tal.---------Dist---------------

यांजकडून दाखला देण्यात येतो की, श्रीमती------------------------------------------------------

is issuing the certificate to Mrs.------------------------------------------------------------

आधार कार्ड क्रमांक --------------------------------

Adhar Card Number ---------------------------------

हे ग्रामपंचायत----------------- ता.------------------जि.-----------------------, महाराष्ट्र

Of grampanchayat --------------------Tal.--------------Dist.--------------, Maharashtra

येथील रहिवासी असून त्यांचे पती कै.श्री.--------------------------------- हे मयत असून त्या विधवा आहेत.

is a resident and her husband Mr.----------------------------- is died and she is widow.

सदरचा दाखला अर्जदाराच्या मागणीनुसार त्यांचे पतीच्या मृत्युच्या दाखल्यावरुन व स्थानिक चौकशी करुन देण्यात येत आहे.

This certificate is issued on request of the applicant after verifying the death certificate of her husband and after the local enquiry.

ठिकाण :- सही व शिक्का

Place :- Signature with Stamp

ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी

Gramsevak/Village Development Officer

**परित्यक्त्या प्रमाणपत्र**

**Certificate of Deserted**

दाखला.क्र.------------------------------------ दिनांक :- -------------------

Certificate Number : -------------------------- Date : -------------------------

सरपंच/ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ----------------- ता.--------------- जि.----------------

Sarpanch/Gramsevak/Village Development Officer ----------- Tal.-----------Dist---------------

यांजकडून दाखला देण्यात येतो की, श्रीमती-----------------------------------------------------

is issuing the certificate to Mrs.------------------------------------------------------------

आधार कार्ड क्रमांक --------------------------------

Adhar Card Number --------------------------------

हे ग्रामपंचायत------------------ ता.---------------------जि.-------------------, महाराष्ट्र येथील रहिवासी आहेत.

is a resident of grampanchayat ----------------------Tal.--------------Dist.--------------, Maharashtra

त्या परित्यक्त्या असून त्यांनी आजपर्यंत पुर्नविवाह केलेला नाही.

She is deserted and she is not remarried.

सदरचे प्रमाणपत्र अर्जदाराच्या मागणीनुसार, प्रतिज्ञापत्र व स्थानिक चौकशी करुन देण्यात येत आहे.

This certificate is issued on request of the applicant after verifying the affidavit local level enquiry.

ठिकाण :- सही व शिक्का

Place :- Signature with Stamp

ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी

Gramsevak/Village Development Officer

## विभक्त कुटूंब प्रमाणपत्र

## Nuclear Family Certificate

दाखला.क्र.----------------------------------- दिनांक :- -------------------

Certificate Number : -------------------------- Date : -------------------------

सरपंच/ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ----------------- ता.---------------- जि.---------------

Sarpanch/Gramsevak/Village Development Officer --------- Tal.---------Dist-----------------

यांजकडून दाखला देण्यात येतो की, श्री/श्रीमती-------------------------------------------------

is issuing the certificate to Mr./Mrs.-------------------------------------------------------

आधार कार्ड क्रमांक --------------------------------

Adhar Card Number --------------------------------

हे ग्रामपंचायत----------------- ता.--------------------जि.------------------------, महाराष्ट्र

Of grampanchayat -------------------Tal.-------------Dist.----------------, Maharashtra

येथील रहिवासी असून त्याच्या कुटूंबातील पुढील सदस्यांसह स्वतंत्र कुटूंबधारक आहेत.

१)

२)

३)

४)

is a resident with the following family members as a separate family head.

१)

२)

३)

४)

स्थानिक चौकशीच्या आधारे विभक्त कुटुंब प्रमाणपत्र त्यांचे विनंती अर्जानुसार देण्यात येत आहे.

Certified that this is a nuclear family as per the local level enquiry and Certificate is issued on request of the applicant.

सही व शिक्का

Signature with Stamp

ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी

Gramsevak/Village Development Officer

### दाखल्याबद्दल पावती

### Receipt of the certificate

**ग्रामपंचायत : ------------ तालुका : ------------ जिल्हा : ------------**

Grampanchayat :------------------Tal.-----------District.-----------

दिनांक : पावती क्रमांक :

Date : Receipt No :

श्री./श्रीमती :------------------------------------------- रा.---------------, ता. --------------, जि.---------------

यांजकडून ----------------------प्रमाणपत्र यासाठी रक्कम रुपये.-------------------प्राप्त झाले

Received from Mr./Mrs.-----------------------------of village --------------, Tal.--------------, District.-----------,

charges of Rs.------------------ for the ------------------- certificate

अक्षरी :-

In words :-

सही व शिक्का

Signature with Stamp

ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी

Gramsevak/Village Development Officer

## अधिसूचना

ग्रामविकास व जलसंधारण विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक : १० जुलै, २०१५

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५.

क्रमांक.आरटीएस-२०१५/प्र.क्र.३२/पंरा ५.- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ (२०१५ चा महा.अध्यादेश क्र.५) याच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे ग्राम विकास विभागामार्फत ग्रामपंचायतींद्वारे पात्र व्यक्तींना देण्यात यावयाच्या लोकसेवा आणि यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विर्निदिष्ट केल्याप्रमाणे उक्त अध्यादेशाच्या प्रयोजनार्थ अशा लोकसेवा देण्याकरिता विहित कालमर्यादेसह पदनिर्देशित अधिकारी आणि प्रथम अपील प्राधिकारी व द्वितीय अपील प्राधिकारी अधिसूचित करीत आहे.

## अनुसूची

| अ. क्र. | लोकसेवेचे नाव. | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा (कामकाजाचे दिवस). | पदनिर्देशित अधिकाऱ्याचे नाव. | प्रथम अपील प्राधिकारी. | द्वितीय अपील प्राधिकारी. |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | जन्म नोंद दाखला. | ५ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| २. | मृत्यु नोंद दाखला. | ५ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| ३. | विवाह नोंद दाखला. | ५ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| ४. | रहिवाशी दाखला. | ५ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| ५. | दारिद्रय रेषेखाली असल्याचा दाखला. | ५ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| ६. | हयातीचा दाखला. | ५ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| ७. | ग्रामपंचायत येणे बाकी दाखला. | ५ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| ८. | शौचालयाचा दाखला. | ५ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| ९. | नमुना ८ चा उतारा. | ५ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |

| अ. क्र. | लोकसेवेचे नाव. | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा (कामकाजाचे दिवस). | पदनिर्देशित अधिकाऱ्याचे नाव. | प्रथम अपील प्राधिकारी. | द्वितीय अपील प्राधिकारी. |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १०. | निराधार असल्याचा दाखला. | २० दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| ११. | विधवा असल्याचा दाखला. | २० दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| १२. | परित्यक्ता असल्याचा दाखला. | २० दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| १३. | विभक्त कुटुंबाचा दाखला. | २० दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वि.गिरिराज,
शासनाचे प्रधान सचिव.

## NOTIFICATION

Rural Development and Water
Conservation Department,
Bandhakam Bhavan, 25,
Marzban Path, Fort,
Mumbai 400 001.
Dated the 10th July 2015.

**Maharashtra Right to Public Services Ordinance, 2015.**

No.RTS-2015/CR-32/PR 5.- In exercise of the powers conferred by sub-section *(1)* of section 3 of the Maharashtra Right to Public Services Ordinance, 2015 (Mah.Ord.No.V of 2015), the Government of Maharashtra hereby, notifies the public services to be rendered by the Rural Development Department through the Grampanchayats to the eligible persons, and the stipulated time limits for providing such public services, along with the Designated Officers, First Appellate Authorities and Second Appellate Authorities, as specified in the Schedule appended herewith, for the purposes of the said Ordinance.

## SCHEDULE

| Sr. No. | Name of the Public Service. | Time limit for providing service (working days). | Designated Officer whom services will be provided. | First Appellate Authority. | Second Appellate Authority. |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 1. | Birth Certificate. | 5 days | Gram Sevak | Assistant Block Development Officer | Block Development Officer |
| 2. | Death Certificate. | 5 days | Gram Sevak | Assistant Block Development Officer | Block Development Officer |
| 3. | Marriage Certificate. | 5 days | Gram Sevak | Assistant Block Development Officer | Block Development Officer |
| 4. | Residence Certificate. | 5 days | Gram Sevak | Assistant Block Development Officer | Block Development Officer |
| 5. | Below Poverty Line Certificate. | 5 days | Gram Sevak | Assistant Block Development Officer | Block Development Officer |
| 6. | Living Certificate. | 5 days | Gram Sevak | Assistant Block Development Officer | Block Development Officer |
| 7. | No Dues Certificate. | 5 days | Gram Sevak | Assistant Block Development Officer | Block Development Officer |
| 8. | Toilet Certificate. | 5 days | Gram Sevak | Assistant Block Development Officer | Block Development Officer |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 9. | Assessment Certificate. | 5 days | Gram Sevak | **Assistant Block Development Officer** | **Block Development Officer** |
| 10. | Certificate of Niradhar. | 20 days | Gram Sevak | **Assistant Block Development Officer** | **Block Development Officer** |
| 11. | Widow Certificate. | 20 days | Gram Sevak | **Assistant Block Development Officer** | **Block Development Officer** |
| 12. | Certificate of Deserted. | 20 days | Gram Sevak | **Assistant Block Development Officer** | **Block Development Officer** |
| 13. | Nuclear Family Certificate. | 20 days | Gram Sevak | **Assistant Block Development Officer** | **Block Development Officer** |

By order and in the name of the
Governor of Maharashtra,

V. Giriraj

V. Giriraj,
Principal Secretary to Government.